# पुणे महानगरपालिका
# * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक २५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २२/९/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ५२४**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. १५/९/२०२० चे पत्र.

पुणे मनपा व पुणे कॅन्टोमेंट बोर्ड यांचे कचरा प्रकल्प एकमेकांपासून अवघ्या ५ कि.मी. अंतरावर असून मे. भुमी ग्रीन एनर्जी ठेकेदार कचरा प्रक्रियेकरीता दोन्ही संस्थांकडे वेगवेगळे दर आकारात आहे. मे. भुमी ग्रीन एनर्जी या ठेकेदाराने पुणे कॅन्टोमेंट बोर्ड यांचेकडील कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व १५ वर्षाकरीता चालविणे हे निविदा काम बीओटी तत्वावर प्रकल्प, मशिनरी, वजनकाटा स्व:खर्चाने उभारुन देखभाल दुरुस्ती खर्च/टिपिंग फी रु.२७७/– प्रति मे.टन प्रति २ वर्षानंतर ५% दरवाढ या दराने करण्याचे मान्य केलेले आहे. मे. भुमी ग्रीन एनर्जी याच ठेकेदाराने पुणे मनपा यांचेकडील उरळी देवाची–फुरुसुंगी येथील कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व १५ वर्षाकरीता चालविणे हे निविदा काम प्रकल्प, मशिनरी, वजनकाटा मनपा खर्चाने उभारुन देखभाल दुरुस्ती खर्च/टिपिंग फी रु.५०२/– प्रति मे.टन प्रति १ वर्षानंतर ८.५% दरवाढ या दराने करण्याचे मान्य केलेले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे पुणे मनपा व पुणे कॅन्टोमेंट बोर्ड यांचेकडील कचरा प्रकल्प उभारणी दर व कचरा प्रक्रिया दर यांची तुलना केली असता त्यात कोटयावधी रुपयांची तफावत प्रथमदर्शनीच अढळुन येत आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख श्री. ज्ञानेश्वर सिताराम मोळक यांचे कुटुंबिय पदाधिकारी असलेल्या शिवस्फुर्ती प्रतिष्ठान या खाजगी संस्थेचे मे. भुमी ग्रीन एनर्जी हे ठेकेदार प्रायोजक/देणगीदार असल्यामुळेच मनपा प्रशासन त्यांचेवर मेहरबान होवून चढया दराने सदोष निविदा प्रक्रियेद्वारा निविदा स्वीकारत असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच, सद्यस्थितीत मनपाकडील कार्यरत कचरा प्रक्रिया प्रकल्पांकरीता श्री. ज्ञानेश्वर सिताराम मोळक यांचे स्वाक्षरीने मे. भुमी ग्रीन एनर्जी या ठेकेदारास दरवर्षी कोटयावधी रुपये अदा केले जात आहे. सदर बाब गंभीर असुन पुणे मनपाच्या पर्यायाने करदात्या पुणेकरांच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे.

मे. भुमी ग्रीन एनर्जी या ठेकेदाराने पुणे कॅन्टोमेंट बोर्डाकडे दाखल केलेले कचरा प्रक्रियेचे दर पुणे मनपाकडील सर्व कार्यरत कचरा प्रक्रिया प्रकल्पांना तात्काळ लागू करण्यात यावे, जेणेकरुन पुणे मनपा अर्थसंकल्पीय निधीतील कोटयावधी रुपयांची बचत होईल. तसेच, श्री. ज्ञानेश्वर सिताराम मोळक यांचे मे. भुमी ग्रीन एनर्जी या ठेकेदाराच्या बिलांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार काढून घेण्यात यावे. तसेच, उरळी देवाची–फुरुसुंगी येथील कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व १५ वर्षाकरीता चालविणे ही निविदा अनेक कारणास्तव वादग्रस्त ठरीत असल्याने प्रस्तुतच्या ठरावान्वये रद्द करण्यात यावी.

**विषय क्र. ५२५**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. १६/९/२०२० चे पत्र.

दिनांक १५/०९/२०२० रोजी झालेल्या मा.स्थायी समिती ठराव क्र.५०८ विषय क्र.४८८ औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत आऊटसोर्सिंग पध्दतीने हददीतील झाडणकाम करणे या विषयाचा फेरविचार करण्यात यावा.

**विषय क्र. ५२६**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. १६/९/२०२० चे पत्र.

दिनांक १५/०९/२०२० रोजी झालेल्या मा.स्थायी समिती ठराव क्र.५०७ विषय क्र.४८७ शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत सन २०१९–२० व सन २०२०–२१ मधील सार्वजनिक स्वच्छता व झाडण काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे या विषयाचा फेरविचार करण्यात यावा.

**विषय क्र. ५२७**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. १६/९/२०२० चे पत्र.

दिनांक १५/०९/२०२० रोजी झालेल्या मा.स्थायी समिती ठराव क्र.५०६ विषय क्र.४८६ शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.७ व प्रभाग क्र. १४ मध्ये विविध ठिकाणी पडिक हददीची ठेकेदारी पध्दतीने स्वच्छता करून घेणे या विषयाचा फेरविचार करण्यात यावा.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ५२८**

मिळकतकराची थकबाकी वसूल होण्यासाठी व पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी मिळकत कर अभय योजना राबविणेबाबत मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि.२०/११/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १५९० दि. २६/११/२०१९, मा.विशाल धनवडे व मा.प्रमोद ओसवाल यांचे दि.६/२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २४७१ दि. १४/२/२०१९, मा.ॲड्.अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.१५/१/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २०६९ दि. २१/१/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/११३० दि.२४/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १८/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५२९**

मा.दिपक मानकर व मा.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ७/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर वेळेत न भरल्यास प्रतिमहा २ टक्के दंड आकारला जातो. म्हणजेच एका वर्षात २४ टक्के इतका दंड आकारला जातो. दंडाची ही रक्कम जाचक असून नागरिकांकडून दंडाची रक्कम कमी करणेबाबत अनेकवेळा मागणी केली जाते. पुणे महानगरपालिकेकडून पूर्वी मिळकत कराची अभय योजना राबवून दंडाच्या रकमेतून सूट देण्यात आली होती. यावेळी पुणे महानगरपालिकेस कोटयावधी रूपयांचे उत्पन्न मिळाले होते. वास्तविक मिळकत कराची पावती प्राप्त न झाल्याने अनेक नागरिकांकडून मिळकत कर वेळेत भरला जात नाही. तद्नंतर दंडाची जाचक रक्कम मिळकत करात समाविष्ट होवून मिळकत कराची रक्कम जास्त असल्याने गोरगरीबांना सदर रक्कम भरणे शक्य होत नाही. पर्यायाने दंडाची रक्कम वाढत जाते. सद्यस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबविली असून त्याच धर्तीवर पुणे महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबवावी.

सबब गोरगरीब नागरिकांसाठी निवासी मिळकत कराबाबत पुणे महानगरपालिकेने अभय योजना राबवावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १८/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५३०**

पुणे महानगरपालिकेकरीता माहिती तंत्रज्ञान सल्ला सेवा देणारे मे.प्राईस हाऊस वॉटर कुपर्स प्रा.लि. यांच्या कामास मुदतवाढ देणेस व माहिती तंत्रज्ञान सल्ला सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी M/s.Ernst & Young यांची दोन वर्षांकरीता नियुक्ती करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मावतं/२४० दि. २०/८/२०२० चे पत्र.

1) मे.महाराष्ट्र शासन निर्गमित मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामध्ये नमुद शासन निर्णयानुसार मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि. यांना शासन निर्णयामधील Designation प्रमाणे नमूद केलेल्या मनुष्यबळ उपलब्ध करून घेतल्यानुसार शासन निर्णयातील तरतूदी व दर पत्रकानुसार र.रू.98,38,500/- (अक्षरी अठ्यानव्व लाख अडतीस हजार पाचशे फक्त) बिल अदा करणेस

२) मे.प्राईस वॉटर कुपर्स प्रा.लि.यांना मे.महाराष्ट्र शासन निर्णयातील तरतूदीनुसार, दरपत्रकानुसार तसेच नमूद कालावधी (दि.01/12/2019 ते 31/08/2020 पर्यंत) उपलब्ध करून घेणेस.

३) मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि.यांना मुदतवाढीचा कार्यादेश देणेस.

४) M/s.Ernst & Young प्रतिमहा र.रू.9,20,700/- (करविरहित) यांची 2 वर्षांकरीता नेमणूक करणेस.

५) M/s.Ernst & Young यांना कार्यादेश देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस.

६) भविष्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या जीआर(GR) नुसार होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने बिल अदा करणेस

७) M/s.Ernst & Young यांना पुणे मनपाच्या गरजेनुसार कमी अधिक प्रमाणात आवश्यक मनुष्यबळ घेऊन शासन निर्णय महाराष्ट्र शासन, डायरेक्टर ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी यांचेकडील शासन निर्णय क्र.मातंसं.080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT(MH) मंत्रालय, मुंबई दि.09/05/2019 मध्ये नमूद दरानुसार बिल अदा करणेस.

८) सदर रक्कम RE11N103 (सन 2020-2021) अर्थशिर्षकातून खर्च करणेस.

१ मुख्यदेखरेख वसुली वगैरे

ड सांख्यिकी व संगणक प्रमुख

३ विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकमार्फत करून घेणे व तद्नुषंगिक कामे करणे.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५३१**

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी अंतर्गत कोविड-१९ या करिता प्रभाग क्र. ३८ व ४१ मध्ये कॅन्टेमेंट झोन सील करणे व सीसीसी सेंटर व अवेटेड सेंटर येथे आवश्यकतेनुसार पत्र्याचे शेड उभे करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे हे काम अत्यंत महत्वाचे व तातडीचे असल्याने जाहिर निविदा न काढता मे.समर्थ कन्स्ट्रक्शन या एजन्सीकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/२५२ दि.२६/८/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी अंतर्गत कोविड-१९ या करिता प्रभाग क्र. ३८ व ४१ मध्ये कॅन्टेमेंट झोन सील करणे व सीसीसी सेंटर व अवेटेड सेंटर येथे आवश्यकतेनुसार पत्र्याचे शेड उभे करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणेस

सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी – RE17F 257

Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२) मे.समर्थ कन्स्ट्रक्शन यांचेशी करार करणेस

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार दि.२८/४/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५३२**

महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनिसिपल कर्जरोखे धारण करणार यांचे माहितीकरीता दि. ३१/३/२०१९ अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्ज/कर्जरोखेच्या रकमांचे व कर्ज/कर्जरोखे बाकीसंबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिध्द करणेस व त्यांच्या प्रती महाराष्ट्र सरकार व मा.अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/२५३ दि. २७/८/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५३३**

देवाची उरुळी, फुरसुंगी डेपो येथे लॅंडफिलच्या कामकाजासाठी भाडेतत्वावर चेन बुलडोझर मशीन पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नॅशनल अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९८,७७५/- पेक्षा १.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४९,३३,७९०=९२ रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२६० दि.२/९/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

**विषय क्र. ५३४**

जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचेबरोबर भामा आसखेड धरणातून पुणे शहरासाठी आवश्यक असलेल्या पाणी वापरासाठी करावयाच्या कराराचा मसूदा मान्य करणे व करारनामा करणे यासाठी मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु(भाआ)/२८८ दि.१५/९/२०२० चे पत्र.

१) जलसंपदा विभाग व पुणे महानगरपालिका यांचे दरम्यान पाणी वापराबाबतचा करारनामा मंजुर कोट्याप्रमाणे व MWRRA च्या अटी शर्तीसह करारनामा करणेस.

२) जलसंपदा विभाग व पुणे महानगरपालिका यांचे दरम्यान पाणी वापराबाबत कोट्याप्रमाणे करारनामा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्रदान करणेस.

३) शासन निर्णयानुसार वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या दरानुसार पाणी वापराची देयके जलसंपदा विभागाकडे अदा करणेस.

**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**